मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी महापालिकेत आता तीन शहर अभियंते

## पिंपरी-चिंचवड महापालिकेत प्रशासकीय पातळीवर मोठा निर्णय घेण्यात आला असून मुख्य अभियंत्याची दोन्ही पदे रद्द करण्यात आली आहेत,

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेतील मुख्य अभियंत्याची दोन्ही पदे रद्द करण्यात आली असून, त्याऐवजी शहर अभियंत्याची तीन पदे निर्माण करण्याचा निर्णय सर्वसाधारण सभेत उपसूचनेद्वारे घेण्यात आला आहे. तीनपैकी दोन पदांवर पदोन्नतीची शिफारस तातडीने करण्यात आली, तर एक पद रिक्त ठेवण्यात आले आहे.



तत्कालीन शहर अभियंता मकरंद निकम यांनी फेब्रुवारी २०२६ मध्ये स्वेच्छानिवृत्ती घेतली. त्यानंतर ते पद रिक्त होते. शहर अभियंता आणि मुख्य अभियंता ही दोन्ही पदे समकक्ष आहेत. चार वर्षांपूर्वी मुख्य अभियंता या पदाची निर्मिती करण्यात आली. संजय कुलकर्णी आणि प्रमोद ओंभासे हे सद्यःस्थितीत मुख्य अभियंता पदावर कार्यरत आहेत. त्यातील कुलकर्णी यांना मोशी दुर्घटनेनंतर निलंबित करण्यात आले आहे. कुलकर्णी, ओंभासे हे दोघेही शहर अभियंतापदासाठी इच्छुक होते. परंतु, हे पद समकक्ष असल्याने मुख्य अभियंत्याला शहर अभियंता होता येत नव्हते. त्यानुसार पदोन्नती समितीने सहशहर अभियंता मनोज सेठिया यांच्या नावाची शहर अभियंतापदासाठी शिफारस केली होती.

हा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीसाठी आला असताना सत्ताधारी भाजपने उपसूचना मांडून सेवा प्रवेश नियमांमध्ये बदल केला. सध्याच्या आस्थापनेवरील शहर अभियंता, मुख्य अभियंता एक आणि मुख्य अभियंता दोन ही समकक्ष पदरचना बदलून मुख्य अभियंत्याची दोन्ही पदे रद्द करण्याचा निर्णय घेतला. त्याऐवजी शहर अभियंता एक, शहर अभियंता दोन आणि शहर अभियंता तीन अशी तीन पदे निर्माण करण्यास शासनाच्या मंजुरीच्या अधीन राहून मान्यता देण्यात आली.

शहर अभियंता एक या पदासाठी प्रमोद ओंभासे, तर शहर अभियंता तीन या पदासाठी मनोज सेठिया यांच्या पदोन्नतीस मंजुरी देण्यात आली. मात्र, शहर अभियंता दोन हे पद रिक्त ठेवण्यात आले. त्यामुळे हे पद भविष्यात कोणासाठी राखीव ठेवण्यात आले आहे, अशी चर्चा महापालिका वर्तुळात सुरू झाली आहे. मोशी कचरा डेपो दुर्घटनेनंतर मुख्य अभियंता एक म्हणून कार्यरत असलेले संजय कुलकर्णी यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली असून त्यांची चौकशी सुरू आहे.

### उपसूचना सभागृह नेत्यांकडे?

**» नगरसेवकांनी दिलेल्या उपसूचना नगरसचिवांकडे देणे आवश्यक असते. परंतु, मंगळवारी दुपारपर्यंत त्या सभागृह नेत्यांकडे होत्या. उपसूचनांची विभागणी करण्यासाठी त्या सभागृह नेत्यांच्या दालनात दिल्या होत्या, असे स्पष्टीकरण नगरसचिव मुकेश कोळप यांनी दिले.**

# पिंपरीत आता विजेवर चालणारी बस; बीआरटी, एचसीएमटीआर मार्गावर धावणार बस

## बीआरटी व एचसीएमटीआर मार्गावर तीन डब्यांची 'ईआरटीएस' (इलेक्ट्रिक रॅपिड ट्रान्झिट सिस्टीम) बस सुरू होणार आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील बीआरटी (बस रॅपिड ट्रान्झिट सिस्टीम) आणि उच्च क्षमता द्रुतगती मार्गावर (एचसीएमटीआर) तीन डब्यांची विजेवर चालणारी 'ईआरटीएस' बस (इलेक्ट्रिक रॅपिड ट्रॉन्झिट सिस्टीम) सुरू करण्यात येणार आहे. या प्रकल्पाचा पहिला टप्पा म्हणून १७ किलोमीटर लांबीचा प्रायोगिक मार्ग विकसित करण्यात येणार आहे. पुणे-नाशिक महामार्ग ते मुंबई-बंगळूर महामार्गास जोडणाऱ्या 'बीआरटी' मार्गावर हा प्रकल्प महामेट्रोच्या सहकार्याने दीड वर्षांच्या कालावधीत प्रायोगिक तत्त्वावर कार्यान्वित करण्याचे नियोजन करण्यात आले. त्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) महामेट्रो तयार करणार आहे.



शहराचे नागरीकरण वेगाने वाढत असून, शहरांतर्गत प्रवासासाठी सार्वजनिक वाहतूक सुविधा महापालिकेने उपलब्ध करून देण्याचा सूचना राज्य शासनाने दिल्या आहेत. वाढती लोकसंख्या, वेगाने वाढणारे शहरीकरण आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवरील वाढता ताण लक्षात घेऊन भविष्यातील वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम, गतिमान व प्रवाशाभिमुख करण्याच्या दृष्टीने उच्च क्षमता द्रुतगती मार्ग (एचसीएमटीआर) विकसित करण्यात येणार आहे. शहरातील बीआरटी मार्गावर पीएमपी बसची उपलब्धतता कमी आहे. त्यामुळे विजेवर चालणारी 'ईआरटीएस' बसची चाचपणी केली जात आहे.

प्रायोगिक प्रकल्प यशस्वी झाल्यानंतर एचसीएमटीआर व शहरातील सर्व बीआरटी मार्गांवर ईआरटीएस प्रणालीचा टप्प्याटप्प्याने विस्तार करण्यात येणार आहे. शहरातील सर्व मेट्रो स्थानके, रेल्वे स्थानके आणि इतर सार्वजनिक वाहतूक व्यवस्थांशी प्रभावी व सुलभ जोडणी निर्माण करून नागरिकांना अखंड, जलद आणि प्रवाशाभिमुख प्रवासाचा अनुभव देण्याचा या प्रकल्पाचा उद्देश असल्याचे शहरी दळणवळण विभागाचे कार्यकारी अभियंता सुनील पवार यांनी सांगितले.

### पहिल्या टप्प्यात १७ किलोमीटर मार्गावर बस

**» पहिल्या टप्प्यात भोसरीतील गोडाऊन चौक-कुदळवाडी चौक-ऑटो क्लस्टर-काळेवाडी फाटा-जगताप डेअरी- वाकड चौक या बीआरटीएस मार्गावर 'ईआरटीएस' बसचे नियोजन आहे. त्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी महामेट्रोने ८५ लाखांचा खर्च असल्याचे कळवले आहे.**

# पवना धरण 100 टक्के भरले तरी पिंपरी-चिंचवडची पाणीकपात कायम

## 15 टक्के पाणी कपात तात्काळ रद्द करण्यास पाटबंधारे विभागाचा नकार; उपलब्ध साठा जपून वापरण्याचे आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराची तहान भागविणारे मावळ तालुक्यातील पवना धरण १०० टक्के भरले आहे. तरीही, शहरात २० जूनपासून सुरू असलेली १५ टक्के पाणी कपात तात्काळ रद्द केली जाणार नाही, असे पाटबंधारे विभागाने स्पष्ट केले आहे. ऑक्टोबर २०२६ पर्यंत धरणात १०० टक्के पाणीसाठा उपलब्ध असल्यास त्यावेळेस कपात रद्द करण्याचा विचार केला जाईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

महापालिकेच्या सोमवार (दि. २७) झालेल्या सर्वसाधारण सभेत पाणी कपात रद्द करण्याचा मुद्दा नगरसेवकांनी उपस्थित केला होता. दुसऱ्या दिवशी मंगळवार (दि. २८) आयुक्तांसोबत बैठक घेऊन कपात रद्द केली जाईल, अशी घोषणा सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांनी सभागृहात केली होती. त्यासंदर्भात आयुक्तांसोबत पदाधिकाऱ्यांची बैठक झाली.



### पदाधिकाऱ्यांची मागणी फेटाळली

» महापालिकेच्या सर्वसाधारण सभेनंतर सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर आणि अन्य पदाधिकाऱ्यांनी आयुक्तांकडे पाणी कपात तात्काळ रद्द करण्याची मागणी केली. मात्र, आयुक्तांनी पाटबंधारे विभागाची भूमिका स्पष्ट करत, त्यांच्या परवानगीशिवाय कपात हटविणे शक्य नसल्याचे सांगितले. त्यामुळे पदाधिकाऱ्यांच्या अपेक्षांनंतरही नागरिकांना तत्काळ दिलासा मिळालेला नाही.

यावेळी सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर व विविध समितीचे सभापती व नगरसेवक उपस्थित होते. पदाधिकाऱ्यांनी शहरातील पाणी कपात तात्काळ रद्द करण्याची मागणी आयुक्तांकडे लावून धरली.

मात्र, आयुक्तांनी पाटबंधारे विभागाने आत्ताच पाणी कपात रद्द करण्यास नकार दिल्याचे स्पष्ट केले आहे. पवना धरणात ऑक्टोबर २०२६ पर्यंत १०० टक्के पाणी साठा उपलब्ध असल्यास कपात रद्द करण्याबाबत विचार केला जाईल. सध्याचा पाऊस किती काळ असेल, पावसाच्या संपूर्ण हंगामात पाऊस असेल का याचा अंदाज नाही.

त्यामुळे उपलब्ध पाणी काटकसरीने वापरणे आवश्यक असल्याचे त्या पाटबंधारे विभागाचे मत आहे. पाटबंधारे विभागाने परवानगी दिल्यास महापालिका कपात रद्द करेल, असे पदाधिकाऱ्यांना सांगण्यात आले आहे. त्यामुळे सध्या तरी पाणीकपात कायम राहणार आहे.

### पाणी कपात कायमच

» पवना धरण १०० टक्के भरले असले तरी पिंपरी-चिंचवड शहरातील १५ टक्के पाणी कपात सध्या कायम राहणार आहे. पाटबंधारे विभागाने तातडीने कपात रद्द करण्यास नकार दिल्यामुळे महापालिकेला निर्णय घेता आलेला नाही. धरणातील उपलब्ध पाणीसाठा ऑक्टोबर २०२६ पर्यंत टिकून राहतो का, याचा आढावा घेतल्यानंतरच कपात हटविण्याबाबत विचार केला जाईल. त्यामुळे नागरिकांना सध्या पाणी वापरात काटकसर करावी लागणार आहे.

### पाण्याचा काटकसरीने वापर करा

» पाटबंधारे विभागाच्या मते, सध्या धरण पूर्ण भरले असले तरी संपूर्ण पावसाळ्यात पावसाचे प्रमाण कसे राहील, याचा निश्चित अंदाज देता येत नाही. त्यामुळे भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे आवश्यक आहे. पाऊस, धरणातील आवक आणि पाणीसाठ्याचा नियमित आढावा घेतल्यानंतरच पुढील निर्णय घेतला जाणार आहे. तोपर्यंत नागरिकांनी पाणी जपून वापरण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# बारा कोटींचा रस्ता अन् अडीच वर्षांतच चाळण

## चिखलीतील राधा स्वामी सत्संग रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य, ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे नागरिकांचा जीव धोक्यात

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिखली येथील राधा स्वामी सत्संग रोडवर मागील अडीच वर्षांपूर्वी तब्बल १२ कोटी रुपये खर्चून तयार करण्यात आलेल्या रस्त्याची पार दैना झाली आहे. अल्पावधीतच या रस्त्याची अक्षरशः चाळण झाली आहे. महापालिकेच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करून उभारण्यात आलेल्या या मुख्य रस्त्यावर आज सर्वत्र खड्ड्यांचे साम्राज्य पसरले असून ठेकेदार आणि प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे रोज हजारो वाहनचालकांना आपला जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.



विशेष म्हणजे, रस्ता तयार झाल्यापासून आत्तापर्यंत सुमारे चार ते पाच वेळा यावर वरच्यावर डागडुजी करण्यात आली आणि डांबराचे थर देण्यात आले. मात्र, गुणवत्तेचा अभाव आणि निकृष्ट दर्जाच्या कामामुळे दरवेळी पहिल्याच पावसात हे डांबर उखडून रस्ता पूर्ववत खड्डेमय होत आहे.

सध्या सुरू असलेल्या पावसामुळे या रस्त्यावरील परिस्थिती अधिकच बिकट झाली असून खड्ड्यांमध्ये पाण्याचे तळे साचत आहे. रस्त्यावरून जाताना वाहनचालकांना खड्ड्यांचा अंदाज येत नसल्याने लहान-मोठे अपघात घडत आहेत. दुचाकीस्वार घसरून पडण्याचे प्रकार वारंवार घडत असून रात्रीच्या वेळी किंवा पावसात या खड्ड्यांमधून सुरक्षितपणे ये-जा करणे म्हणजे चालकांसाठी मोठा धोका पत्करण्यासारखे झाले आहे. कोट्यवधी रुपये खर्च करूनही नागरिकांच्या पदरी केवळ यातनाच आल्याने स्थानिक रहिवासी आणि वाहनचालकांमधून प्रचंड संताप व्यक्त केला जात आहे. ठेकेदाराने केलेल्या निकृष्ट कामाची चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करावी आणि या रस्त्याची तातडीने कायमस्वरूपी दुरुस्ती करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

> राधा स्वामी सत्संग रस्त्याच्या दुरवस्थेबाबत सविस्तर माहिती मागवली जाईल. पावसाळ्यामुळे नागरिकांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन तातडीने हे खड्डे बुजवण्याचे निर्देश देण्यात आले असून लवकरात लवकर काम पूर्ण केले जाईल.
>
> - शिवाजी चौरे, स्थापत्य विभाग (फ प्रभाग)

> अडीच वर्षांपूर्वी १२ कोटी रुपये खर्चून केलेल्या रस्त्याची इतक्या काळात चाळण होणे ही बाब अत्यंत गंभीर आहे. ठेकेदाराच्या निकृष्ट कामामुळे नागरिकांचा जीव धोक्यात आला आहे. महापालिकेने तात्पुरती डागडुजी न करता या कामाची चौकशी करावी आणि नागरिकांना दिलासा देण्यासाठी तातडीने दर्जेदार दुरुस्ती करावी.
>
> - यश साने, नगरसेवक

# पुणे महापालिकेची सुरक्षा कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या भरवशावर; 398 कायमस्वरूपी पदे रिक्त

## 523 मालमत्तांच्या सुरक्षेची जबाबदारी खासगी यंत्रणांवर; एसओपी लागू असली तरी मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे सुरक्षेवर प्रश्नचिन्ह

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेने मुख्य प्रशासकीय इमारतीसह सर्व कार्यालयांमध्ये कडक सुरक्षा नियमावली (एसओपी) लागू करून सुरक्षाव्यवस्था अधिक सक्षम करण्याचा दावा केला असला, तरी प्रत्यक्षात महापालिकेची सुरक्षा व्यवस्था मोठ्या प्रमाणावर कंत्राटी कर्मचाऱ्यांवर अवलंबून असल्याचे वास्तव समोर आले आहे. सुरक्षा विभागातील तब्बल ३९८ कायमस्वरूपी पदे रिक्त असल्याने प्रशासनाने संवेदनशील मालमत्तेच्या सुरक्षेची जबाबदारी खासगी एजन्सींवर सोपविल्याचे चित्र आहे.

महापालिकेच्या सुरक्षा विभागात एकूण ६६६ सुरक्षा रखवालदारांची मंजूर पदे आहेत. मात्र, त्यापैकी केवळ २६८ कर्मचारी कार्यरत असून, ३९८ पदे अद्याप रिक्त आहेत. म्हणजेच जवळपास ६० टक्के पदांवर कर्मचारी उपलब्ध नाहीत. परिणामी, महापालिकेच्या ताब्यातील ५२३ इमारती, दवाखाने, शाळा, उद्याने, जलकेंद्रे, स्मशानभूमी आणि इतर महत्त्वाच्या मालमत्तांच्या सुरक्षेसाठी खासगी सुरक्षा यंत्रणांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहावे लागत आहे.

या पार्श्वभूमीवर सध्या तीन खासगी कंपन्यांमार्फत तब्बल १,९६५ कंत्राटी बहुउद्देशीय कामगार कार्यरत आहेत. सुरुवातीला १,५६५ कर्मचाऱ्यांचा कार्यादेश देण्यात आला होता. त्यानंतर आणखी ३५० कंत्राटी कामगारांना मंजुरी देत ही संख्या १,९६५ पर्यंत वाढविण्यात आली. यामुळे कायमस्वरूपी सुरक्षा भरती करण्याऐवजी कंत्राटी मनुष्यबळ वाढविण्यावरच प्रशासनाचा भर असल्याचे स्पष्ट होत आहे.

महापालिकेने २०१० पासून वर्ग-४ कर्मचाऱ्यांची भरती बंद असल्याचे कारण दिले असले, तरी गेल्या दीड दशकात सुरक्षा विभागातील रिक्त पदांचा अनुशेष सातत्याने वाढत गेला आहे. परिणामी, महापालिकेच्या महत्त्वाच्या आणि संवेदनशील मालमत्तेच्या सुरक्षेची जबाबदारी आता बहुतांश खासगी एजन्सींच्या कर्मचाऱ्यांवर आली आहे.




### कंत्राटी मनुष्यबळावर वाढते अवलंबित्व

**» महापालिकेने सुरक्षा व्यवस्थेसाठी सध्या तीन खासगी एजन्सींकडून १,९६५ बहुउद्देशीय कंत्राटी कामगार नियुक्त केले आहेत. सुरुवातीला १,५६५ कर्मचाऱ्यांना कार्यादेश देण्यात आला होता. त्यानंतर आणखी ३५० कर्मचाऱ्यांची भर घालण्यात आली. कायमस्वरूपी भरती न झाल्याने संवेदनशील शासकीय मालमत्तेच्या सुरक्षेसाठी खासगी एजन्सींवर मोठे अवलंबित्व निर्माण झाले आहे. वारंवार बदलणारे कंत्राटी कर्मचारी आणि त्यांचे प्रशिक्षण हा भविष्यातील सुरक्षा व्यवस्थेसमोरील महत्त्वाचा प्रश्न मानला जात आहे.**

### सुरक्षा विभागातील रिक्त पदांची वस्तुस्थिती

**» महापालिकेच्या सुरक्षा विभागात एकूण ६६६ मंजूर पदांपैकी केवळ २६८ कर्मचारी कार्यरत असून तब्बल ३९८ पदे रिक्त आहेत. म्हणजेच जवळपास ६० टक्के पदांवर कायमस्वरूपी कर्मचारी उपलब्ध नाहीत. या कमतरतेमुळे मुख्य प्रशासकीय इमारत, दवाखाने, शाळा, उद्याने, जलकेंद्रे आणि स्मशानभूमीसह ५२३ मालमत्तांच्या सुरक्षेची जबाबदारी मोठ्या प्रमाणावर कंत्राटी कर्मचाऱ्यांवर आली आहे. सुरक्षा व्यवस्थेतील ही रिक्तता दीर्घकालीन दृष्टीने गंभीर मानली जात असून, प्रशिक्षित कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांची भरती करण्याची मागणी जोर धरत आहे.**

### नव्या सुरक्षा नियमावलीत काय?

**» महापालिकेने अलीकडेच सर्व कार्यालयांसाठी स्टँडर्ड ऑपरेटिंग प्रोसीजर (एसओपी) लागू केली आहे. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना ओळखपत्राशिवाय प्रवेश मिळणार नाही, तर सर्व अभ्यागतांसाठी व्हिजिटर पास अनिवार्य करण्यात आला आहे. आयुक्त कार्यालय, महापौर कार्यालय, सर्व्हर रूम आणि कोषागार विभागाला 'हाय सिक्युरिटी झोन' घोषित करण्यात आले आहे. सीसीटीव्ही देखरेख, प्रवेश नियंत्रण आणि सुरक्षा तपासणीचे नियमही कडक करण्यात आले आहेत. मात्र, या नियमांची अंमलबजावणी करणारे बहुसंख्य कर्मचारी कंत्राटी असल्याने सुरक्षा व्यवस्थेच्या परिणामकारकतेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.**

# पुण्यातील पेठाही आल्या एफडीएच्या रडारावर ; पेठांमध्ये धडक कारवाई ; पाच हॉटेलांचे परवाने निलंबित

## 'एफडीए'ने 24 ते 27 जुलैदरम्यान राबविलेल्या विशेष तपासणी मोहिमेत पुणे शहरातील गणेश पेठ व नाना पेठ परिसरातील घाऊक व्यापाऱ्यांवर विशेष लक्ष केंद्रित केले.

**पुणे | प्रतिनिधी**

अन्नातील भेसळ, निकृष्ट दर्जा आणि अन्न सुरक्षा नियमांच्या उल्लंघनाविरोधात अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) पुणे विभागात मोठी कारवाई करून चार दिवसांत ४५ लाख ७० हजार १६८ रुपयांचा संशयित निकृष्ट, असुरक्षित आणि चुकीच्या लेबलिंगचा अन्नसाठा जप्त केला. पुणे, सातारा आणि सांगलीतील आठ आस्थापनांवर छापे टाकण्यात आले. याशिवाय, स्वच्छता व अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी पाच हॉटेलांचे परवाने निलंबित करण्यात आले.

'एफडीए'ने २४ ते २७ जुलैदरम्यान राबविलेल्या विशेष तपासणी मोहिमेत पुणे शहरातील गणेश पेठ व नाना पेठ परिसरातील घाऊक व्यापाऱ्यांवर विशेष लक्ष केंद्रित केले. तपासणीदरम्यान मिठाई, कँडी, चॉकलेट, सुका मेवा, मसाले, फरसाण आदी अन्नपदार्थ संशयित निकृष्ट, असुरक्षित, चुकीच्या लेबलिंगचे किंवा परवान्याशिवाय साठविल्याचे आढळले. त्यानंतर संपूर्ण साठा जप्त करून नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत. अहवालानुसार पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

कारवाईत सर्वाधिक जप्ती भवानी पेठेतील एका गोदामात झाली. येथे जवळपास ३६.३९ लाख रुपयांच्या 'सेंटर फिल्ड कँडी' आणि 'चॉकलेट वेफर रोल' चा साठा जप्त करण्यात आला. या ठिकाणी आवश्यक अन्न व्यवसाय परवाना नसताना अन्नसाठा ठेवून व्यवसाय सुरू असल्याचेही निदर्शनास आले.

गणेश पेठेतील 'वर्धमान एंटरप्रायझेस' येथून अन्न मलई मिठाई, इमली जेली आणि लव्हली कँडी असा सुमारे ७.८३ लाख रुपयांचा साठा जप्त करण्यात आला. त्याच परिसरातील 'न्यू पांडियन एंटरप्रायझेस' येथून सोनपापडी, चिक्की आणि रसमलाई बर्फी जप्त करण्यात आली. नाना पेठेतील विजय लक्ष्मी ट्रेडर्स येथे फरसाण, तर गोयल सेल्स कॉर्पोरेशन येथून काजू, बदाम, मनुका, मसाले आदी अन्नपदार्थ जप्त करण्यात आले. सांगलीतील दोन आस्थापनांवरही कारवाई करून तूप टोस्ट व बिस्किटांचा साठा जप्त करण्यात आला.



### चार दिवसांत मोठी कारवाई

**» अन्न व औषध प्रशासनाने २४ ते २७ जुलैदरम्यान पुणे विभागात विशेष तपासणी मोहीम राबवत तब्बल ४५.७० लाख रुपयांचा संशयित निकृष्ट अन्नसाठा जप्त केला. पुणे, सातारा आणि सांगली जिल्ह्यांतील आठ आस्थापनांवर छापे टाकून मिठाई, कँडी, चॉकलेट, सुका मेवा, मसाले, फरसाण आणि इतर खाद्यपदार्थ जप्त करण्यात आले. जप्त केलेल्या साठ्याचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले असून अहवालानंतर संबंधितांवर अन्न सुरक्षा व मानके अधिनियमांतर्गत कठोर कारवाई केली जाणार आहे.**

# योजनांची माहिती वेळेवर द्या; पुणे जिल्हा परिषद सभेत प्रशासनाला सदस्यांचा जाब

## आरटीई, कृषी व विकास योजनांवर चर्चा; पारदर्शक कारभारासाठी अध्यक्षांचे प्रशासनाला स्पष्ट निर्देश

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत सोमवारी विविध विभागांच्या कामकाजावरून सदस्यांनी प्रशासनाला धारेवर धरत तक्रारींचा पाऊस पाडला. योजनांची माहिती वेळेवर दिली जात नसल्याची, विषयपत्रिकेतील महत्त्वाचे मुद्दे ऐनवेळी वगळले जात असल्याची आणि सदस्यांना विश्वासात न घेता निर्णय घेतले जात असल्याची नाराजी अनेक सदस्यांनी व्यक्त केली. यावर जिल्हा परिषद अध्यक्षांनी प्रशासनाला सर्व समित्यांच्या माध्यमातून प्रत्येक योजनेची सविस्तर माहिती सदस्यांना वेळेवर उपलब्ध करून देण्याचे स्पष्ट निर्देश दिले.

सभेत आरटीई प्रवेश प्रक्रिया अधिक पारदर्शक करण्याबरोबरच विविध विकास योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला. जिल्हा परिषद सदस्यांना निर्णय प्रक्रियेत अधिक प्रभावीपणे सहभागी करून घेण्याची मागणी सदस्यांनी केली. योजनांची माहिती उशिरा मिळत असल्यामुळे विकासकामांवर परिणाम होत असल्याचेही काही सदस्यांनी निदर्शनास आणून दिले. यावर प्रशासनाने विविध योजनांच्या अंमलबजावणीची सद्यस्थिती सभेसमोर मांडत आवश्यक ती सुधारणा करण्यात येईल, अशी ग्वाही दिली.

सर्वसाधारण सभेत कृषी, आरोग्य, समाजकल्याण, महिला व बालकल्याण, पशुसंवर्धन तसेच कौशल्य विकास विभागांशी संबंधित अनेक विषयांना मंजुरी देण्यात आली. शेती उत्पादनवाढीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, शेतकऱ्यांना विविध योजनांचा लाभ, ग्रामीण भागातील आरोग्यसुविधा बळकट करणे आणि महिला बचत गटांच्या सक्षमीकरणावर विशेष भर देण्यात आला.

याशिवाय डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना, बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना, आत्मा, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (एमएसआरएलएम), महिला प्रभाग संघ तसेच शेतकरी उत्पादक कंपन्या (एफपीओ) यांच्यासाठी कृषी अवजारे व साहित्य खरेदीसह विविध योजनांना सभेने हिरवा कंदील दिला.



### विविध विकास योजनांना हिरवा कंदील

» सभेत कृषी, आरोग्य, समाजकल्याण, महिला व बालकल्याण, पशुसंवर्धन आणि कौशल्य विकास विभागांशी संबंधित अनेक महत्त्वाच्या प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना, बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना, आत्मा, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (एमएसआरएलएम), महिला प्रभाग संघ आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांसाठी कृषी अवजारे व साहित्य खरेदीच्या प्रस्तावांनाही मंजुरी देण्यात आली. ग्रामीण विकासाला गती देण्याच्या दृष्टीने हे निर्णय महत्त्वाचे मानले जात आहेत.

### सदस्यांचा प्रशासनावर प्रश्नांचा भडिमार

» जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत सदस्यांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली. विविध योजनांची माहिती वेळेवर दिली जात नसल्याने विकासकामांवर परिणाम होत असल्याची तक्रार करण्यात आली. तसेच विषयपत्रिकेतील महत्त्वाचे मुद्दे ऐनवेळी वगळले जात असल्याने सदस्यांना निर्णय प्रक्रियेत दुय्यम स्थान दिले जात असल्याचा आरोपही करण्यात आला. यापुढे प्रत्येक समितीमार्फत योजनांची सविस्तर माहिती वेळेत उपलब्ध करून द्यावी, असे स्पष्ट निर्देश जिल्हा परिषद अध्यक्षांनी प्रशासनाला दिले.

### पारदर्शकतेवर प्रशासनाला स्पष्ट निर्देश

» विकास योजनांच्या अंमलबजावणीत पारदर्शकता राखणे आणि सदस्यांना नियमित माहिती देणे ही प्रशासनाची जबाबदारी असल्याचे अध्यक्षांनी स्पष्ट केले. कोणतीही योजना किंवा निर्णय सदस्यांपासून लपविण्यात येणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देशही देण्यात आले. आरटीई प्रवेश प्रक्रिया अधिक पारदर्शक करण्याबरोबरच ग्रामीण आरोग्य, शेती उत्पादनवाढ, महिला बचत गटांचे सक्षमीकरण आणि शेतकऱ्यांना योजनांचा लाभ प्रभावीपणे मिळावा यावरही सभेत विशेष भर देण्यात आला.

---

# पुणे-सातारा महामार्गाबाबत मोठा निर्णय! आता प्रवास होणार अधिक वेगवान अन् कमी वेळेत


## पुणे-सातारा महामार्गावरील खड्डे आणि सततच्या वाहतूक कोंडीतून वाहनचालकांची लवकरच सुटका होणार आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पश्चिम महाराष्ट्राला पुण्याशी जोडणाऱ्या पुणे-सातारा महामार्गाची दुरवस्था झाली असून, हा महामार्ग खड्डेमय बनला आहे. यामुळे वाहतुकीचा वेग मंदावून सातत्याने कोंडी होत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. जेमतेम दोन तासांच्या या प्रवासाला कधीकधी तीन ते चार तास लागतात. आता यावर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने मोठा निर्णय घेतला आहे. यामुळे या महामार्गावरील प्रवास आता अधिक वेगवान होणार असून वाहनचालकांची कोंडीतून सुटका होणार आहे.

पुणे-सातारा महामार्ग १४० किलोमीटर लांबीचा आहे. या महामार्गाचे सहापदरीकरण 'रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर'ने केले. हा प्रकल्प बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा या तत्त्वावर पूर्ण होऊन त्यावर ऑक्टोबर २०१० मध्ये पथकर वसुली सुरू झाली. या महामार्गाच्या देखभाल दुरुस्ती जबाबदारी 'रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर' कडे आहे. मात्र महामार्गाच्या देखभाल व दुरुस्तीवरून सातत्याने तक्रारी केल्या जात असून, संसदेतही प्रश्न उपस्थित करण्यात आले. केंद्रीय परिवहनमंत्री नितीन गडकरी यांनीही 'रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर' बरोबरचा देखभालीबाबतचा करार रद्द करण्यात येईल, असे आधी जाहीर केले होते.

पुणे-सातारा महामार्गाच्या देखभालीसाठी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने त्रयस्थ संस्था नेमण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी २५ कोटी रुपयांचा खर्च केला जाणार असून, तो रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चरकडून वसूल केला जाणार आहे. 'रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर'कडे या महामार्गाची देखभाल व दुरुस्ती सध्या होती. त्रयस्थ संस्था नियुक्तीसाठी निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या कामाचा खर्च सुमारे २४ कोटी ९० लाख रुपये असून, तो पूर्ण करण्याचा कालावधी सहा महिने आहे. या कामासाठी एनएससी प्रोजेक्ट्स, प्रगती कन्स्ट्रक्शन, रोडलिंक इन्फ्राटेक, शेळके कन्स्ट्रक्शन, स्वस्तिक इन्फ्रालॉजिक्स, जयहिंद रोड बिल्डर्स, एमडी इन्फ्रा या सात कंपन्या पात्र आहेत. लवकरच निविदा प्रक्रिया पूर्ण करून त्यात यशस्वी ठरलेल्या कंपनीला कार्यादेश दिला जाईल. त्यानंतर हे काम तातडीने सुरू होईल, अशी माहिती प्राधिकरणातील सूत्रांनी दिली.



### लवकरच काम सुरू

» पुणे-सातारा महामार्गाच्या देखभाल आणि दुरुस्तीबाबत अनेक तक्रारी आल्या. त्यामुळे हे काम त्रयस्थ कंपनीकडे सोपविले जाणार आहे. लवकरात लवकर महामार्गाची दुरुस्ती पूर्ण केली जाणार आहे. या कामाचे पैसे रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीकडून वसूल केले जातील, असे भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक सचिन गौतम यांनी सांगितले.